# शिक्षणाधिकारी (प्राथमिक)जिल्हा परिषद सोलापूर RTE Act २००९
## मान्यता/नुतनीकरण २०२२ ते २०२५ मान्यता आदेश.
## नमुना दोन

522

जाक्र.जिपसो/शिक्षण/खाप्राशा.२/प्राथ./RTE/मा.नु/
सोलापूर दिनांक ३० / ०५ /२०२३

प्रति,

मुख्याध्यापक,
केंब्रीज इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बार्शी, जि.सोलापूर
(शाळेचा युडास क्रमांक : २७३००२००९८१)

**विषय :-** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजार्थ,बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११ पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

शाळेच्या मुख्याध्यापकांनी, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बार्शी कार्यालयाकडे सन **२०२२ ते २०२५** पर्यतच्या आरटीई मान्यतेच्या/नुतनीकरणासाठी सादर केलेल्या प्रस्तावानुसार गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बार्शी यांनी शाळेची तपासणी करुन सदर शाळा नियमानुसार आरटीई ॲक्ट २००९ अन्वये भौतिक सुविधा पूर्ण करीत असलेने गटशिक्षणाधिकारी,पंचायत समिती, बार्शी यांचेकडील पत्रानुसार आरटीई मान्यते बाबतच्या शिफारसीसह स्व-प्रतिज्ञापत्रास आधिन राहून,

मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.सोलापूर **०१/०४/२०२२ ते ३१/०३/२०२५** पर्यंतच्या कालावधीसाठी **इयत्ता १ली ते ८वी केंब्रीज इंटरनॅशनल पब्लिक स्कूल, बार्शी** या शाळेस तात्पुरती RTE-२००९ अंतर्गत नुतनीकरणाने मान्यता देण्यात येत आहे.

**सदरची मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या आधीन राहून देण्यात येत आहे.**

१. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही. आणि इयत्ता **८वी** नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.
२. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतुदीचे शाळा पालन करील.
३. शाळा विनाअनुदानीत असल्यास नजीकच्या दुर्बल घटकांतील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या **किमान २५% मर्यादेपर्यत** प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल, परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तेच्या बाबतीत देखील या प्रमाणकांचे अनुपालन करण्यात येईल.
४. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेले बालकांकरीता शाळेला अधिनियमाचा कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळा स्वतंत्र बँक खाते देईल.
५. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटीशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकांस किंवा त्यांच्या किंवा तिच्या पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
६. शाळा कोणत्याही बालकांस वयाच्या पुराव्याच्या अभावी किंवा धर्म, जात किंवा वंश, जन्म ठिकाण यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारणार नाही.
७. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकांस तो ज्या इयत्तेत शिकत असेल त्या इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत शाळेतून काढून टाकणार नाही.
(दोन) कोणत्याही बालकांस शारीरीक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
(तीन) कोणत्याही बालकांस प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक

असणार नाही.

(चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकांस नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पांच) विकलांग/ विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमांच्या तरतुदीनुसार समावेश करण्यात येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता पाच वर्षाच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची/तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील आणि

(आठ) शिक्षकांने/शिक्षिकेने खाजगी शिकविण्याच्या कामात स्वत:ला गुतंवून घेवू नये,याची सुनिश्चिती शाळा करेल.

८. शाळा समुचित प्राधिकरणांने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमांचे पालन करील.

९. शाळा अधिनियमांच्या कलम २९ मध्ये विहित केलेप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०. शाळा अधिनियमांच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. शाळा तपासणीच्या वेळी शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा आर.टी.ई. च्या दहा निकषांची पुर्तता करीत असलेबाबत **सदर शाळेकडुन / गटशिक्षणाधिकारी** यांचेकडून स्व-प्रतिज्ञापत्र दिलेले आहे.

११. मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम व क्रिडांगण हे केवळ शिक्षणांच्या व कौशल्यविकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०(१८६० चा २१) किंवा मुंबई सार्वजाकि विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

१४. शाळा कोणत्याही व्यक्तीच्या गटाच्या किंवा संघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायदया करीता किंवा नफा मिळवण्यासाठी चालविण्यात येत नाही.

१५. शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखा परीक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरण पत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्रांची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्याकडे पाठविण्यात यावी.

१६. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेताक **(२७३००२००९८१)** असा आहे. हा या कार्यालयाशी पत्रव्यवहार करताना तो नमुद करावा, याची नोंद घ्यावी.

१७. शिक्षण संचालक/शिक्षणाधिकारी हे वेळोवळी मागणी करतील, असे अहवाल व माहीती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल, अशा सुचानांचे पालन करावे.

१८. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही कागदपत्रे असल्यास नुतनीकरणाने सुनिश्चित करावी.

**टिप:-** शाळेतील मुख्याध्यापकांनी **सन २०२२ ते २०२५** पर्यतच्या आरटीई मान्यता/नुतनीकरणासाठी संबंधित गटशिक्षणाधिकारी/प्रशासनाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आलेली ओसी(दुय्यम) नस्ती/फाईल पृष्ट क्रमांकासह आपल्याकडेच व्यवस्थित जपूण ठेवावी. भविष्यात माहिती अधिकारीतील अर्ज कायदेशीर व नियमानुसार शाळेकडे वर्ग करण्यात येईल याची नोद घ्यावी.

(संजय जावीर)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, सोलापूर

**प्रत :** गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, बार्शी यांना माहितीसाठी अग्रेषित.

9 FEB 2024

Education Officer (Primary) Zilla Parishad Solapur RTE Act 2009
Approval / Renewal 2022 to 2025 Approval Order.
Sample Two

522
O.N.ZPS/Edcation/KHAPRASHA
2/PRI./RTE/App.Ren/Solapur Date:03/05/2018

**To,**
**Principal,**
**Cambridge International Public School, Barshi, Dist. Solapur**

Sub:- Subject :- For the purposes of Section 18 of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, the Right of Parents to Free and Compulsory Education Rules 2011 sub-rule 19 sub-rule (4) for issuing recognition certificates to other schools.

According to the proposal submitted by the Principal of the school to the office of the Chief Education Officer, Panchayat Samiti, Barshi for the renewal of Gyastiei approval from the year 2022 to 2025, The Training Officer, Panchayat Samiti, Barshi inspected the school and the said school was completing the physical facilities under the RTE Act 2009 as per the rules of the Group Education Officer, Panchayat Samiti, Barshi. With the recommendation to read RTE approval as per letter and subject to affidavit.

I, Education Officer (Primary) G.P. Solapur for the period from 01/04/2022 to 31/03/2025 Class 1st to 8th Cambridge International Public School, Barshi is being provisionally approved under RTE 2009 for renewal.

**The said approval is given subject to fulfillment of the following conditions.**

1. No extension of approved period. And it is not obligatory to provide approval for 8th standard onwards or related.
2. School should comply with the Right of Children to Free and Compulsory Education Act 2009 and the Right of Children to free and Compulsory Education Rules, 2011.
3. School should reserve 25% of the admission for 1" Standard for children from backward and deprived classes of the nearby locality of the School and the School should also provide such children the free and compulsory primary education as well ensure the compliance thereof for pre-primary standards.
4. School should open a separate bank account for getting recurring aid/grant under Section 12(2) of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009, in respect of children referred in para 3 above.
5. The School or Institute should not accept any capitation fee or should not obliged any child or their parents to go through the selection process.
6. No child should be denied the admission to the School on account of non- submission of age proof, religion, caste or place of birth
7. (One) the Child should be retained in the class where he has admitted to the School or should not be removed from the School until the completion of his primary education.
   (Two) No child should be punished physically or harassed mentally.
   (Three) No child is under obligation to pass the examination of any Education Board, still he completes his primary education.
   (Four) Certificate prescribed under Section 23 should be provided to the child who completes his primary education.
   (Five) Physically handicapped child should be admitted in compliance with the Act.
   (Six) Teachers having the qualification prescribed under Section 23 (1) should be appointed. Teachers who are appointed before the commencement of the Act should get qualified under Section 23(1) within the period of five years.
   (Seven) Teachers should comply with their obligations prescribed under Section 24(1) of the Act.
   (Eight) School should ensure that teachers are not conducting any private Tuition.
8. School will comply with courses prescribed by the Academic Authority.
9. School should provide admission in the proportion of the various facilities made available in the School, in compliance with Section 19 of the Act.

NOTARY GOVT. OF INDIA
Adv. JAYASHRI S. GHODAKE
Dist. Solapur
Maharashtra
Regn. No. 16363

Adv. JAYASHRI S GHODAKE
NOTARY GOVT. OF INDIA
No. 16363 Dist, Solapur (MAH.)

9 FEB 2024

10. The school shall comply with the standards and norms specified in Section 19 of the School Act. An affidavit has been given by the said school / group education officer that they are fulfilling the ten criteria.

11. Unapproved classes or groups may not be conducted on school premises or elsewhere

12. The school building and other constructions and playgrounds shall be used for educational and skill development purposes only.

13. The school is run by a body registered under the Societies Registration Act, 1860 (21 of 1860) or the Bombay Public Trustee Act, 1950.

14. The school is not run for the benefit of any group of persons or for the benefit of any other person,

15. The accounts of the school should be audited and certified by a Chartered Accountant and 15 statements of accounts should be prepared as per rules, one copy of each statement of accounts annually by the District Education Officer. Primary) should be party to.

16. It should be noted that the accreditation number of your school is (27300200981) while corresponding with this office.

17. The school should submit such reports and information as the Director of Education and the Education Officer will demand from time to time or follow such directions as the Shaman or the local authority may give for the continued fulfillment of the school's conditions of accreditation or for the correction of deficiencies in the functioning of the school.

18. Renewal should be ensured if there are any documents of registration of the organization.

Note:- The Headmaster/Principal of the school should keep the OC (secondary) application file with the page number submitted to the office of the concerned Education Officer for renewal of RTE accreditation for the year 2022 to 2025. It should be noted that in future the applications from Information Officer will be classified to the school as per the rules and regulations.

( Education Officer (Primary)
Zilla Parishad, Solapur

Copy: Addressed to Education Officer, Panchayat Samiti, Barshi for information.

NOTARY GOVT. OF INDIA Adv. JAYASHRI S. GHODAKE Dist. Solapur Maharashtra Regn. No. 16363

BEFORE ME

Adv. JAYASHRI S GHODAKE
NOTARY GOVT. OF INDIA
No. 16363 Dist. Solapur (MAH.)

Translated by me

NOTED & REGISTERED
Page No. 102 Sr.No. 107/2024
Dated: 9 FEB 2024

Adv. JAYASHRI S GHODAKE
NOTARY GOVT. OF INDIA
No. 16363 Dist. Solapur (MAH.)

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL
CANCELLED